श्रीमती दानकुँवर हिन्दी कन्या विद्यालय समिती,

(अल्पसंख्याक संस्था)

## श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना

# मराठी भाषा व वाङ्मय विभाग

॥ शिक्षिताः वनिताः राष्ट्रोन्नतेर्मूलम् ॥




संस्थापक
स्व.सेठ कुंदनलालजी अग्रवाल

## मराठी भाषा गौरव दिन २०२४

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना येथील मराठी भाषा व वाङ्मय विभागाच्या वतीने मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध कवी कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.




सर्वप्रथम सरस्वती स्वरूपीनी दानकुँवरमाता, स्व. सेठ कुंदनलालजी अग्रवाल, मराठी साहित्याला अजरामर नटसम्राट नाटक देणारे जेष्ठ नाटककार वि.वा.शिरवाडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक विनोद अग्रवाल आवर्जून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ.विद्या पटवारी, प्राचार्य डॉ.एस.डी. तळेकर, डॉ. जितेंद्र अहिरराव, डॉ. विजय नागोरी, डॉ.स्वाती महाजन, डॉ.सुधाकर वाघ, डॉ.काझी, प्रा.पार्वती देशमुख, प्रा.पूजा अरोरा, डॉ. जयश्री वाडेकर, डॉ.सिंधू राठोड डॉ.आम्रपाली थोरात, प्रा. साईलीला, प्रा.सुवर्णा कचरे, डॉ.वासुदेव उगले व प्रा. प्रविण घुगे तसेच महाविद्यालयातील इतर कर्मचारी उपस्थित होते.



विद्यार्थी प्राध्यापक कविसंमेलन उद्घाटन समारंभ

## कार्यक्रमाचा उद्देश

मराठी भाषेचे संवर्धन करणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या विविध कला गुणदर्शनाला वाव देणे. हा महत्त्वाचा उद्देश डोळ्या समोर ठेऊन हा कार्यक्रम दरवर्षी वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त घेतला जातो. यामध्ये मुलींना साहित्याच्या क्षेत्रात नावाजलेल्या प्रतिभाशाली स्वकर्तुत्वाने पुढे आलेल्या सर्वकवी- लेखक यांच्या साहित्याचा मागोवा घेण्याची संधी मिळते. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. महाविद्यालयात यानिमित्ताने आगळेवेगळी 'काव्यवाचन स्पर्धा' घेतली गेली. यामध्ये सर्वच मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला. तसेच 'नटसम्राट' या लोकप्रिय चित्रपटची चित्रपट परिक्षण स्पर्धा घेण्यात आली व निबंध स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते. सामाजिक दृष्टीकोणातून खुली ऑनलाइन प्रश्न मंजुषास्पर्धा घेण्यात आली.

संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य डॉ.विद्या पटवारी यांनी कवी कुसुमाग्रज यांची 'कणा' ही कविता आपल्या ओघवत्या शैलीत व मंजुळ स्वरात सादर केली. संसार आणि संसारात येणाऱ्या अडचणी यांच्यावर मात करत धीरोदात्तपणे संकटांना सामोरे गेले पाहिजेत असा संदेश या कवितेतून दिला. यानंतर आमच्या महाविद्यालयातील कला व वाणिज्य विभागातील प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थिनींनी स्वरचित कविताचे सादरीकरण केले. कवितांच्या रंगाची उधळण करताना सामाजिक भान असलेल्या वास्तवाची जाण असलेल्या नेणिवेची आण असलेल्या आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ युवा पिढीला मराठी भाषेचे वाण देताना आज भाषा गौरव दिन कवी संमेलनाने कवितांनी रंगीत करून शब्दांची दीपावली साजरी केली.



विद्यार्थी प्राध्यापक कविसंमेलनात काव्य सादरीकरण करताना विद्यार्थिनी

सर्वप्रथम द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी अंजली कांबळे हिने मराठी भाषेवर स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. त्यानंतर मराठी भाषेचे महत्त्व सांगताना साक्षी वाघमारे या विद्यार्थिनी छान कविता सादर केली. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्रियंका देवडे हिने सुस्वरात 'कणा' या कवितेचे सादरीकरण केले. वैष्णवी राजपूत हिने भारतीय संस्कृतीचे महत्त्व सांगताना स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. वैष्णवी गोशिक हिने जीवनवादी कवितेचे सादरीकरण केले. तुलसी मालोदे या विद्यार्थिनी "मी कुणाला कळलोच नाही" या सुरेश भट यांच्या कवितेत दडलेला भावार्थ उलगडून दाखविला. मयुरी शेंडीवाले हिने स्त्री जीवनावर स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. स्मिता पवार, सायली अहिले, दिव्या गाढे, वैष्णवी चुनखडे यांनी स्वरचित कविताचे सादरीकरण करून 'श्रावण आला हिरवाळी घेऊन, महाविद्यालयात रंगली शब्द सुरांच्या संगतीने मैफिल असा अमृतानुभव जुळून आणला.

मातृभाषेत काय ताकद असते? हे आज याची डोळा याची देही पाहायला मिळाले. आजच्या दिनी कवी संमेलनाची रंगत वाढत असताना महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी कविताचे रंग माझा वेगळा असा रीतभात घालून कवितेचे सादरीकरण करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम डॉ.विजय नागोरी यांनी स्वानुभावातून 'मन' ही कविता सादर केली. डॉ.जितेंद्र अहिरराव सर यांनी संस्कृतीची वाटचाल यावर उत्तम कवितेचे सादरीकरण केले. इतिहास विभागाचे डॉ.सुधाकर वाघ यांनी आईवर स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. राज्यशास्त्र विभागाच्या डॉ.झरीना काझी यांनी "या नभाने या भुईला" ही कविता गायली. हिंदी विभागाच्या प्रा. पार्वती देशमुख यांनी आयुष्य कसे जगावे याचे महत्त्व पटवून देताना स्वअनुभव सांगितले.




विद्यार्थी प्राध्यापक कविसंमेलनात काव्य सादर करताना प्राध्यापक वृंद

इंग्रजी विभागाच्या प्रा.पूजा अरोरा व राज्यशास्त्र विभागाच्या डॉ.आम्रपाली थोरात यांनी एक कविता सादर केली. वाणिज्य विभागाच्या प्रा.अंजू कुलकर्णी यांनी स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. अर्थशास्त्र विभागाचे डॉ. केशव सोळंके यांनी पांडुरंगाला हाक देत मिश्र कविता सादर करून सर्वांची मने जिंकली. हिंदी विभागाच्या डॉ. जयश्री वाडेकर यांनी 'या जगण्यावर' व 'आम्ही काय जन्मभर तुम्हाला पुरणार काय?' म्हणून गेली आई! ही स्वरचित जगण्याचा संदेश देणारी कविता उत्कृष्टरित्या सादर केली. इतिहास विभागाच्या प्रा.साईलीला पारिक यांनी 'आई एक नाव असते' या कवितेचे सादरीकरण केले. आमचे ग्रंथपाल नंदकुमार सानप यांनी मराठी भाषेची महती सांगताना शब्दांना सूर दिले.

आज कुसुमाग्रज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठी विभागाचे प्रमुख डॉ.वासुदेव उगले यांनी स्वरचित'बाप' ही कविता शब्दांना अर्थ व सुर देत शब्दाची रसानुभुतीची सांगड घालून सादरीकरण केली. 'वसंत' या टोपण नावाने त्यांचे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. मराठी विभागाचे प्रा.प्रविण घुगे यांनी तोच विषय पुढे नेऊनबापावर बाप नावाची कविता सादर करताना 'आपला बाप आयुष्याचा धागा असतो शेवटपर्यंत कुटुंबासाठी जगाच्या युद्धभूमीत जगत असतो, तो बाप पैशापुरता नसतो..' या कवितेचे अत्यंत विलोभनीय काव्यवाचन करून प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावीत आर्त हाकेची साद दिली. मराठी विभागाच्या प्रा.डॉ.सिंधू राठोड यांना बापावर कविता सादर करताना बापाची उणीवत्रैलोकात भरून निघणार नाही. आपल्या सुमधुर आवाजातून मातृभाषेतील शब्दांचाप्रत्येकाच्या काळजावर आघात करताना डोळ्यातून अश्रूधारा वाहण्यास भाग पाडले. असा हा मराठी विभागाच्या वतीने युट्युब वर

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya JALNA

प्रत्यक्ष प्रक्षेपित केला गेलेला हा नवउपक्रम मराठी भाषेचे महत्त्व व गरज म्हणून नव्हे तर मातृभाषा टिकली पाहिजे, ती शिकली पाहिजेत हा महाराष्ट्र संस्कृतीचा ठेवा तुम्ही आम्ही जपला पाहिजे. यासाठी नवतरुण पिढीला जे इंटरनेटच्या मायाजालात गुंतून बसले आहेत, त्यांना व त्यांच्यासाठी हा मोलाचा संदेश आहे. आजच्या कार्यक्रमाचे नियोजन मराठी विभागाचे प्रमुख डॉ.वासुदेव उगले डॉ. सिंधु राठोड आणि प्रा.प्रविण घुगे यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सिंधू राठोड यांनी केले. या भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाचा समारोप करताना प्रा.प्रविण घुगे यांनी मराठी विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे संस्थेचे संचालक विनोद अग्रवाल यांचे आभार मानले. तसेच सर्व उपस्थित प्राध्यापक-प्राध्यापिका सेवक व शिक्षकेतर कर्मचारी व उपस्थित विद्यार्थिनींचे आभार व्यक्त केले.


## मराठी भाषा दिन महत्त्व आणि निष्कर्ष

मराठी भाषा गौरव दिन हा विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जीवन कार्याला श्रद्धांजली म्हणून साजरा करतो. तसेच महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मराठी भाषेच्या वापरास प्रोत्साहन देतो. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि पुरस्कार सोहळ्यांद्वारे हा दिवस लोकांना मराठी साहित्याचे सौंदर्य आणि विविधता स्वीकारण्यास आणि साजरे करण्यास प्रोत्साहित करतो. ज्यांनी सर्जनशील शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे मराठी भाषा आणि साहित्याच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अशाच याच दिवशी यथोचित सन्मान करण्यात येतो. महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनींना या कार्यक्रमांमुळे राज्याचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दाखविण्याची आणि मराठी भाषेच्या वापरास प्रोत्साहन देण्याची संधी मिळते.

## दखल प्रसारमाध्यमांची

**पार्श्वभूमी**

**मराठी भाषा गौरव दिनी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या कवितांनी वाढविली रंगत**



**लोकमत**

**दानकुंवर विद्यालयात कवी संमेलन रंगले**

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना: कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन शहरातील श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संचालक विनोद अग्रवाल, प्रभारी प्राचार्य डॉ. विद्या पटवारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी अंजली कांबळे हिने मराठी भाषेवर स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. त्यानंतर मराठी भाषेचे महत्त्व सांगताना साक्षी वाघमारे या विद्यार्थिनी छान कविता सादर केली. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्रियंका देवडे हिने सुस्वरात कणा या कवितेचे सादरीकरण केले. तसेच वैष्णवी राजपूत हिने भारतीय संस्कृतीचे महत्त्व सांगताना स्वरचित कवितेचे सादरीकरण केले. वैष्णवी कौशिक हिने जीवनवादी कवितेचे सादरीकरण केले. स्मिता पवार, सायली अहिरे, दिव्या गाढे, वैष्णवी चुनखडे यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. तसेच डॉ. विजय नागोरी, डॉ. जितेंद्र अहिरराव, डॉ. सुधाकर वाघ, डॉ. वासुदेव उगले, प्रा. प्रवीण घुगे, प्रा. डॉ. सिंधू राठोड यांनी कवितांचे सादरीकरण केले.

Hello Jalna
Page No. 4 Mar 02, 2024
Powered by: erelego.com

विभागप्रमुख

Principal
Smt. Dankunwar Mahila
Mahavidyalaya, Jalna.